**Prabhat, Pune, September 01, 2010**




टीसीएसने आयोजित केलेल्या टीसीएस आयटी विझ २०१० या स्पर्धेत पुणे विभागातून प्रथम आलेल्या एमएमसीएस शाळेतील प्रीयम पत्की आणि तेजस देशपांडे यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील डेपोटी कमांडंट अजित भोसले यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

# टीसीएस आयटी विझमध्ये एमएमसीएसचे प्रीयम आणि तेजस ठरले विजेते

पुणे, दि. ३१ – आज झालेल्या टीसीएस आयटी विझ २०१० स्पर्धेत पुणे क्षेत्रात एमएमसीएस शाळेतील प्रीयम पत्की आणि तेजस देशपांडे यांचा संघ प्रथम आला. ते आता या क्षेत्राचे राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करतील. दुसऱ्या क्रमांकावर आर्मी पब्लिक स्कूलचे ग्यानेंद्र मिश्रा व एस. ऋषिराज निवडले गेले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील अजित भोसले यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. यावेळी टीसीएस पुणेचे उपप्रमुख अरविंद पांडे उपस्थित होते. याशिवाय सहा विभागीय फेऱ्यात प्रथम आलेल्या संघांनाही यावेळी पुरस्कार देण्यात आले. हा कार्यक्रम हैदराबाद, बंगलोर, मुंबई इत्यादी ठिकाणी होणार आहे.